# माहितीचा अधिकार अधिंनियमाखाली माहिती प्रकट करण्याला अपवाद

माहितीचा अधिकार हा भारताच्या संविधानाच्या कलम १९(अ) अन्वये ज्याची नागरिकांना हमी दिलेली आहे असा मूलभूत अधिकार आहे. नागरिकांनी सार्वजनिक प्राधिकरणाकडे पाठवलेल्या माहिती मागणाऱ्या विनंत्यांना उत्तर देणे माहितीचा अधिकार कायदा अनिवार्य ठरवतो. या अधिनियमाचा प्राथमिक उद्देश नागरिकांना त्यांनी मागितलेली माहिती समयबद्ध पद्धतीने मिळेल अशी खबरदारी घेणे आणि त्यायोगे त्यांना सार्वजनिक प्राधिकरणांना जबाबदार ठरवण्यास सबल करणे असा आहे.

**१. अधिनियमाखालील अपवाद:- कलम ८**

यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे, माहिती हा मूलभूत अधिकार आहे आणि कोणत्याही परिस्थितीत ती दिलीच पाहिजे, परंतु असे असले तरी याला काही विशिष्ठ अपवाद आहेत. सर्व माहिती नागरिकांना मिळवता येत नाही. या नमुन्यात आपण विविध अपवाद आणि सार्वजनिक प्राधिकरणे या अपवादांचा माहिती नाकरण्यासाठी कसा गैरवापर करतात यावर दृष्टिक्षेप टाकणार आहोत.

माहिती केवळ दोन कलमांखाली, म्हणजे कलम ८(१) आणि कलम ९ खाली नाकारता येते. माहिती नाकारण्याची संभाव्य कारणे आणि ज्यांच्यामध्ये माहिती नाकारली जाऊ शकेल अशा परिस्थिति यांची यादी त्यात आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ८(१) मध्ये ज्यांच्यानुसार माहितीसाठीचा अर्ज नाकारता येईल अशा दहा अपवादांची तरतूद केली आहे. या अपवादांवर पुढे सविस्तर चर्चा केली आहे:-

**अ.** कलम ८(१)(क):- *"या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,: - जी माहिती प्रकट केल्याने भारताच्या सार्वभौमत्वाला किंवा एकात्मतेला, राज्याच्या सुरक्षेला, युद्धतंत्रविषयक, वैज्ञानिक किंवा आर्थिक हितसंबंधांना, परकीय राज्यांबरोबरच्या संबंधांना बाधा पोहोचेल किंवा अपराधाला चिथावणी मिळेल, अशी माहिती'*

जन माहिती अधिकारी एखादा अर्ज माहिती प्रकट केल्यास सार्वभौमत्व, एकात्मता, सुरक्षितता, धोरण, राज्याचे वैज्ञानिक किंवा आर्थिक हितसंबंध किंवा त्याच्या परकीय राज्यांबरोबरच्या संबंधाना बाधा पोहोचेल किंवा अपराधाला चिथावणी मिळेल असे कारण देत माहितीसाठीचा अर्ज नाकारू शकतो.

जन माहिती अधिकाऱ्याने हे कलम वापरल्यास, त्या माहितीमुळे सार्वभौमत्व, एकात्मता किंवा उपरोक्तपैकी कोणत्याही घटकास बाधा येईल हे स्पष्ट नमूद करणे त्याच्यासाठी बंधनकारक आहे.

उदाहरण:- लष्करी व्यूहरचना, शस्त्रास्त्रे, आण्विक संकेताक्षरे आणि त्याप्रकारची अन्य संवेदनक्षम माहिती या कलमाखाली नाकारता येते. अशा प्रकारची माहिती बहुधा 'गोपनीय' ठरवता येते आणि जन माहिती

अधिकारी ती माहिती सामायिक करणे नाकारतो. तथापू, माहितीचा अधिकार अधिनियमाखाली गोपनीय माहितीच्या संदर्भात कोणतीही खास तरतूद नाही.

वगळलेल्या भागाचा अपवाद सोडता सर्व माहिती सामायिक करणे आवश्यक आहे हा मूलभूत नियम आहे. जन माहिती अधिकाऱ्याने हे उपकलम वापरुन माहिती सामायिक करण्यास नकार दिल्यास अर्जदार प्रथम अपीलिय प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करू शकतो आणि त्या अपीलात अर्जदार जन माहिती अधिकाऱ्याने कोणत्या कारणाने ती माहिती सामायिक करण्यास नकार दिला, आणि ती माहिती सामायिक केल्याने देशाच्या सार्वभौमत्वास कधी बाधा पोहोचेल याबाबत विचारणा करू शकतो. जन माहिती अधिकाऱ्यास ते सिद्ध करण्यात अपयश आल्यास संबंधित माहिती सामायिक करणे बंधनकारक आहे.

दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि विरुद्ध सुधीर व्होरा या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने असे ग्राह्य धरले आहे की सर्व स्थूणायुक्त तलाधार आणि अधिसंरचनांची सर्व पोलादी प्रबलनाचे तपशील, पायाचे तपशील, अभियांत्रिकी गणिते आणि मेट्रोच्या स्तंभ क्र ६७ च्या प्रबाहू आधारांशी संबंधित मातीच्या चाचण्या यांच्यासह सर्व संरचनात्मक आरेखने अभियंते, ठेकेदार, उपठेकेदार आणि क्षेत्रावर कार्यरत अन्य लोकांना देण्यात आली होती. त्यामुळे अशा माहितीचे पूर्वीच प्रकटन झाले असल्याने माहितीच्या प्रकटन आणि प्रदानाने राज्याच्या वैज्ञानिक आणि आर्थिक हितसंबंधाना बाधा पोहोचणे संभवत नाही.

**ब.** माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ८(१)(ख) मध्ये नमूद केले आहे की:- *"या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,: - कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केली आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल अशी माहिती."*

जी माहिती प्रकाशित करण्यावर प्रकट बंधन घातले आही ती प्रकट करण्यात येणार नाही असे या अधिनियमात स्पष्ट नमूद केले आहे याची नोंद घ्यावी.

यामध्ये काही प्रकरणांमधील न्यायालयाने विशेषकरून सामायिक करण्यास किंवा प्रकट करण्यास बंदी घातलेल्या तपाशीलांचा समावेश आहे. कायद्याने येथे न्यायालयाधीन माहितीचा अपवाद केलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी. न्यायालयाधीन या संज्ञेची व्याख्या *'जे न्यायालयाच्या विचाराधीन आहे आणि त्यामुळे ज्याच्याबाबत कोणीही प्रकट भाष्य करू शकत नाही'* अशी आहे.

या व्याख्येनुसारच न्यायालयाधीन माहितीवर भाष्य करणे बेकायदा ठरते, परंतु ते माहितीच्या अधिकाराला लागू नाही. माहिती सार्वजनिक असल्यास, जन माहिती अधिकाऱ्याने ती माहिती देणे आवश्यक आहे. 'न्यायालयाधीन असणे' हे कारण माहिती नाकरण्यासाठी देता येत नाही.

ए के गोयल विरुद्ध आर एन शर्मा या प्रकरणात मा केंद्रीय माहिती आयोगाने ग्राह्य धरले की, माहितीचा अधिकार अधिनियमाची ही तरतूद लागू करण्यापूर्वी सार्वजनिक प्राधिकरणाने कोणत्या माहितीमुळे न्यायालयाचा अवमान होईल हे ठरवणे आवश्यक आहे. **तथापि, न्यायालयाधीन प्रकरणांची माहिती प्रकट**

**करण्यावर बंदी घालणारा विवक्षित आदेश असल्याखेरीज अशी माहिती प्रकट करण्याने न्यायालयाचा अवमान होत नाही."**

जन माहिती अधिकाऱ्यांनी कलम ८(१)(ख) चा वापर माहिती नाकारण्यासाठी केल्याची अनेक उदाहरणे आहेत. काही प्रकरणात ते सत्य असले तरी, अनेक प्रकरणात त्यामागे सबळ कारण नसल्याचे निदर्शनास आले आहे. जन माहिती अधिकारी सर्वसाधारणपणे हे कलाम उद्धृत करत माहिती न्यायालयाधीन असल्याने प्रकट करता येणार नाही असे सांगतात.

'न्यायालयाधीन' असण्याची तरतूद वापरली जाण्याच्या अशा परिस्थितीत, अर्जदाराने अपीलिय प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करून त्या अपीलात जन माहिती अधिकाऱ्याला परिणाम सिद्ध करण्याचे निर्देश देण्याची मागणी करावी. कायदा न्यायालयाधीन माहिती देण्यास बंदी घालत नसल्याने जन माहिती अधिकारी ते सिद्ध करू न शकल्यास त्याला माहिती द्यावी लागेल.

**क.** अधिनियमाच्या कलम ८(१)(ग) नुसार, *"या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,: - जी प्रकट केल्याने संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या विशेषाधिकाराचा भंग होईल, अशी माहिती."*

जेथे संदड किंवा विधानमंडळासमोर अहवाल किंवा दस्तऐवज सादर करणे आवश्यक असते अशा प्रकरणात विशेषत्वाने हा अपवाद वापरला जातो.

उदाहरण:- राज्ये किंवा केंद्राच्या अंदाजपत्रकाचे दस्तऐवज ते सादर होईपर्यंत या कलमाखाली येतात. सहसा केंद्र सरकार आणि राज्य शासने आयुक्त/ न्यायाधीशांच्या नेतृत्वाखाली असे अहवाल तयार करण्यासाठी समिती नेमतात. अशा अहवालांचा काही काळासाठी अपवाद केला असला तरी, चौकशी आयोग अधिनियमाच्या कलम ३(४) अन्वये, असे सर्व अहवाल संसद किंवा विधानमंडळात सादर केल्यापासून सहा महिन्यात जाहीर करणे आवश्यक असते.

चौकशी आयोग अधिनियमाच्या कलम ३(४) अन्वये, *"चौकशी समितीने कोणताही अहवाल सादर केलेला असल्यास संबंधित सरकार प्रकरणानुसार संसद किंवा राज्य विधानमंडळाच्या सदनापुढे तो त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह त्या आयोगाने संबंधित सरकारकडे तो अहवाल सादर केल्या दिवसापासून सहा महिन्यांच्या कालावधीत ठेवेल."*

त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्याने चौकशी आयोगाचा अहवाल नाकारण्यासाठी कलम ८(१)(ग) वापरल्यास अर्जदार अपील दाखल करण्यासाठी हे कलम वापरू शकतो. अपीलानुसार तो युक्तिवाद करू शकतो की, चौकशी आयोग अधिनियमानुसार चौकशी अहवालासारखी माहिती सहा महिन्यांनंतर स्वेच्छेने जाहीर करणे आवश्यक आहे आणि सहा महीने लोटलेले असल्याने हा अहवाल जनतेसाठी जाहीर करणे बंधनकारक आहे.

ड. अधिनियमाच्या कलम ८(१)(घ) नुसार, *"या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,:- वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता, व्यावसायिक गुपिते किंवा बौद्धिक संपदा यांचा समावेश असलेली जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, जी प्रकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल, अशी माहिती."*

हा अपवाद लागू करण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्याने प्रथमत: मागितलेली माहिती व्यावसायिक गुपित किंवा बौद्धिक संपदा आहे किंवा कसे हे निर्धारित करणे आवश्यक आहे. त्याशिवाय, जन माहिती अधिकाऱ्याने ती माहिती प्रकट करण्याने कोणत्याही व्यवसायातील स्पर्धात्मक स्थानाला हानी होईल किंवा कसे हे निर्धारित करणे देखील आवश्यक आहे.

उदाहरण:- उद्या सरकारने कोकोकालाच्या गुप्त पाककृतीत गुंतवणूक केली आणि एखाद्या व्यक्तीने माहितीच्या अधिकाराखाली कोकाकोलाची गुप्त पाककृती विचारली तर ती माहिती कोकाकोलाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल म्हणून प्रकट करता येणार नाही.

परंतु, ही तरतूद भारतीय रेल्वेला लागू होणार नाही कारण त्यांना स्पर्धा नाही आणि भारतीय रेल्वेचा एकाधिकार आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकाराखालील एखाद्या अर्जाला प्रतिसाद देताना जन माहिती अधिकाऱ्याने हा अपवाद लागू केल्यास अर्जदार अपीलाच्या संदर्भात युक्तिवाद करू शकतो की ही माहिती व्यावसायिक गुपित आहे आणि अशी माहिती प्रकट करण्याने स्पर्धात्मक स्थानास हानी होईल हे सिद्ध करणे आवश्यक आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंटस ऑफ इंडिया विरुद्ध शौनक एच सत्या आणि अन्य या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ग्राह्य धरले की माहितीचा अधिकार अधीनियमाचे कलम ८(१)(घ) प्रश्नपत्रिकांमधील प्रश्नांची आदर्श उत्तरे परीक्षक आणि नियामकांना काही सूचना दिलेल्या असल्यास परीक्षेनंतर आणि उत्तरपत्रिकांची तपासणी पूर्ण झाल्यावर त्या जाहीर करण्यावर बंदी घालत नाही कारण त्याने त्या टप्प्यावर कोणत्याही तृतीय पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानास हानी होणार नाही.

शोंख टेक्नॉलॉजी इंटरनॅशनल लि विरुद्ध महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण विभाग, आणि युनायटेड टेलिकॉम लि विरुद्ध महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण विभाग आणि अन्य (डब्ल्यु पी क्र २०११ चे २९१२ आणि ३१३७) या प्रकरणात मा मुंबई उच्च न्यायालयाने एकत्रित आदेश दिले की या प्रकरणांमध्ये संबंधित खात्याने वाहन चालवण्याच्या परवान्याची व नोंदणी पुस्तिकांची स्मार्ट कार्ड पुरवण्यासाठी तृतीयपक्षाशी केलेले करार माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम कलम ८(१)(घ) नुसार नाकारता येणार नाहीत कारण अशा करारांच्या प्रकटीकरणाने व्यावसायिक गुपिते किंवा बौद्धिक संपदांचे प्रकटीकरण होणार नाही. अशी माहिती प्रकट केल्याने जनता प्रक्रिया आणि करारांची छाननी करण्यास समर्थ होईल आणि त्यामुळे माहिती पुरवणे व्यापक जनहिताच्या संदर्भात आवश्यक आहे.

ई. अधिनियमाच्या कलम ८(१)(ड) नुसार, *"या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,:- जी माहिती प्रकट करणे व्यापक*

*लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यक्तिरिक्त, एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे तिला उपलब्ध असणारी माहिती"*

विश्वासाश्रित संबंध म्हणजे असे संबंध ज्यात एखादी व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीवर कोणत्याही प्रकारचा भरवसा, विश्वास ठेवते आणि तिच्यावर अवलंबून राहते. ज्या व्यक्तीवर भरवसा आणि विश्वास ठेवला आहे, त्या व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीच्या फायद्याच्या आणि हिताच्या दृष्टीने योग्य कृती करणे हे विश्वासपात्र कर्तव्य असते.

उदाहरण:- व्यक्तीगत बँक खात्याचे तपशील, रुग्णांचे वैद्यकीय अभिलेख, वकील आणि अशील यांच्यातील संबंध इत्यादि.

परंतु, सार्वजनिक प्राधिकरणाशी सामाजिक केलेली बहुतांश जाहीर माहिती विश्वासपात्र म्हणून दिलेली नसते तर ती विधिक आवश्यकता असते. उदाहरणार्थ, एखाद्या कंपनीने उद्योग खात्याकडे दिलेली माहिती हे कर्तव्य असते आणि विश्वासाश्रित संबंध ठरत नाही. कंपनीला ती माहिती सामायिक करण्याला पर्याय नसतो. त्यामुळे ती माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागितल्यास जनतेला देणे आवश्यक आहे.

सामान्यत: जन माहिती अधिकारी 'विश्वासाश्रितता' हा अपवाद अनेक माहिती अधिकाराखालील मागण्यांसाठी सरसकट लागू करतात. अशा परिस्थितीत आपिळार्थी अपील दाखल करून जन माहिती अधिकाऱ्याकडील माहिती विश्वासाश्रित आहे असा खुलास मागू शकतात आणि नसल्यास अशी माहिती त्यांच्यामार्फत जनतेला उपलब्ध करून देण्याची मागणी करू शकतात.

सीबीएसईने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन विरुद्ध आदित्य बंदोपाध्याय या प्रकरणात विश्वासाश्रित संबंधांच्या अपवादाचा आधार घेतला होता परंतु परीक्षा मंडळाचे परीक्षा देण्याऱ्या विद्यार्थ्यांशी विश्वासाश्रित संबंध नसतात त्यामुळे या प्रकरणात हा अपवाद लागू होत नाही या कारणाने फेटाळला गेला आणि विद्यार्थ्याला उत्तरपत्रिकांच्या प्रती पुरवाव्या लागल्या.

**फ.** अधिनियमाच्या कलम ८(१)(च) नुसार, *"या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,:- विदेशी शासनाकडून विश्वासपूर्वक मिळालेली माहिती"*

याचा संदर्भ विदेशी शासनाने विश्वासपूर्वक पुरवलेल्या माहितीशी आहे. उदाहरण:- राफाईल जेट्सच्या प्रकरणात हा अपवाद माहितीच्या अधिकाराखाली माहिती नाकारण्यासाठी वापरला गेला.

परंतु, विदेशी शासनाने विशिष्ठ विश्वासाने पुरवलेल्या काही माहितीचा अपवाद करता येतो. शकता असेल तेव्हा अशी माहिती जाहीर करणे सरकारसाठी बंधनकारक असते.

जेव्हा एखाद्या प्रकरणात जन माहिती अधिकारी हा अपवाद लागू करतो तेव्हा अर्जदार अपील सादर करून ती माहिती विदेशी शासनाने विश्वासाने सामायिक केली होती हे सिद्ध करण्याचे आव्हान देऊ शकतो.

श्री सुहास चकमा विरुद्ध परराष्ट्र संबंध खाते या प्रकरणात दलाली आवर्तनाच्या संदर्भात मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्याने हा अपवाद लागू करून नाकारली. त्यानंतर मा केंद्रीय माहिती आयोगाने ग्राह्य धरले की:-

*"भारत सरकार स्वतःच माहितीच्या पारदर्शक प्रकटीकरणाला समर्थन देत आहे हे लक्षात घेता आणि या प्रकरणातील वादबिंदू केवळ एका व्यक्तीसाठी काळजीचा विषय नाही तर त्यात राष्ट्रीय हित सामावलेले आहे हे तथ्य डोळ्यासमोर ठेवता, या प्रकरणात जनहित सर्वोच्च आहे आणि मागितलेली माहिती पुरवलीच पाहिजे याबाबत वाद असू शकत नाही."*

**ग.** अधिनियमाच्या कलम ८(१)(छ) नुसार, *"या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,:- जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबाजवणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्रोत किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती"*

हा अपवाद ज्या माहितीमुळे कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अशा माहितीच्या संदर्भात आहे.

ज्या प्रकरणात जागल्यांचा संबंध आहे किंवा गैरकृत्यांबाबत माहिती सामायिक केलेली आहे आणि ज्यामध्ये प्रकटीकरणाने अशा व्यक्तिला इजा होऊ शकते अशा प्रकरणात हा अपवाद लागू करता येतो. परंतु माहिती दिल्याने इजा होईल याचा विशिष्ठ पुरावा हवा, ती केवळ कल्पना असू शकत नाही.

अशा परिस्थितीत देखील माहितीच्या अधिकारानुसार व्यक्तीची ओळख गुप्त ठेवण्यासाठी संबंधित तपशील काढून माहिती सामायिक करण्यास परवानगी देतो. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्याने हा अपवाद वापरल्यास, अर्जदार अपील दाखल करून जन माहिती अधिकाऱ्याने ही माहिती प्रकट करण्याने इजा होईल असा विश्वास ठेवण्यास रास्त कारण आहे हे आधी सिद्ध करणे आवश्यक आहे असा युक्तिवाद करू शकतो.

सुजीत कुमार मजुमदार वकील विरुद्ध सीबीआय या प्रकरणात ज्या सीबीआय अधिकाऱ्यांच्या विरोधात फिर्यादी दाखल आहेत किंवा दाखल करणे विचाराधीन आहे आणि तपास करण्यात आला आहे किंवा सुरू आहे अशा अधिकाऱ्यांचे तपशील मागितले होते. जन माहिती अधिकाऱ्याने हा अपवाद लागू करत माहिती नाकारली, परंतु मा केंद्रीय माहिती आयोगाने या महितीला हा अपवाद लागू होत नाही असे कारण देत माहिती प्रकट करण्याचे आदेश दिले.

**ह.** अधिनियमाच्या कलम ८(१)(ज) नुसार, *"या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,:- ज्या माहितीमुळे अपराध्यांचा तपास*

*करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल, अशी माहिती"*

या अपवादात स्पष्ट शब्द वापरलेले आहेत. त्याचा संदर्भ अशा परिस्थितीशी आहे जिच्यात माहिती उघड करण्याने तपास प्रक्रियेत अडथळे येतील. अमुक माहिती उघड केल्याने तपास प्रक्रियेत किंवा गुन्हेगारांच्या विरोधात खटला चालवण्यात अडथळा येईल याबाबत निर्णायक पुरावा असल्याखेरीज हा अपवाद लागू करून माहिती रोखता येणार नाही.

हा अपवाद सहसा पोलिसांशी संबंधित प्रकरणांमध्ये जन माहिती अधिकारी लागू करतात आणि कळवतात की अमुक माहिती जाहीर करता येणार नाही कारण त्यामुळे तपास प्रक्रियेत अडथळा येईल.

बी एस माथुर विरुद्ध दिल्ली उच्च न्यायालयाचे जन माहिती अधिकारी या प्रकरणात मा दिल्ली उच्च न्यायालयाने असे ग्राह्य धरले की केवळ एखादा तपास किंवा चौकशी प्रलंबित आहे हा माहिती रोखण्यासाठी पुरेसा आधार ठरणार नाही. मागितलेल्या माहितीच्या प्रकटीकरणामुळे तपासात अडथळा येईल, किंवा किमान विपरीत परिणाम होईल किंवा हस्तक्षेप होईल असे दर्शवणे आवश्यक आहे.

ई. अधिनियमाच्या कलम ८(१)(झ) नुसार, *"या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,:- मंत्रिमंडळाची कागदपत्रे, तसेच, मंत्रीपरिषद, सचिव व इतर अधिकारी यांच्या विचारविमार्शाचे अभिलेख:*
*परंतु, मंत्रीपरिषदेचे निर्णय, त्याची कारणे आणि ज्या आधारावर ते निर्णय घेण्यात आले होते ती सामग्री ही, निर्णय घेतल्यानंतर आणि ते प्रकरण पूर्ण झाल्यावर किंवा समाप्त झाल्यावर जाहीर करण्यात येईल:*
*परंतु आणखी असे की, या कलमामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अपवादांतर्गत असणाऱ्या बाबी प्रकट करण्यात येणार नाहीत:"*

अनेकदा हेतुपूरस्सर या पोटकलमाचा अर्थ मंत्रीपरिषदेच्या सर्व कागदपत्रे आणि चर्चांच्या प्रकटीकरणाला सरसकट बंदी असा लावला जातो. अधिनियम स्पष्ट नमूद करतो की आधी माहिती आणि ज्यांच्या आधारे मंत्रीपरिषदेने निर्णय घेतला आहे अशी कागदपत्रे एकदा निर्णय घेतल्यावर जाहीर करण्यात येतील.

ही या संदर्भातील सरसकट बंदी नसल्याने, एकदा निर्णय घेतल्यावर जन माहिती अधिकारी अशी माहिती प्रकट करण्यास नकार देऊ शकत नाही. असे असूनही माहिती नाकारली गेल्यास अर्जदार अपील दाखल करून एकदा निर्णय घेतल्यावर माहिती जाहीर करणे कसे आवश्यक आहे असा युक्तिवाद करू शकतो.

**ज.** अधिनियमाच्या कलम ८(१)(ज) नुसार, *"या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आबंधन असणार नाही,:- जी माहिती प्रकट करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची, राज्य जन माहिती अधिकाऱ्याची किंवा अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरून, जी प्रकट करण्याचा*

*कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील, आधी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती:*

*परंतु, जी माहिती संसदेला किंवा राज्य राज्य विधानमंडळास देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीस देण्यासही नकार देता येणार नाही."*

हा माहितीच्या अधिकाराचा अनेकदा सर्वाधिक चुकीचा अर्थ लावला जाणारा अपवाद आहे. अनेकदा जन माहिती अधिकाऱ्यांचा कल सर्वच वैयक्तिक माहिती खासगी ठरवण्याकडे असतो. दुर्दैवाने वैयक्तिक आणि खासगी यात स्पष्ट फरक करण्यात आलेला नाही आणि अधिकारी याचा गैरफायदा घेतात.

हा अधिनियम सर्वच वैयक्तिक माहितीवर सरसकट बंदी घालत नाही आणि खासगी माहितीचा अपवाद संघटना, संस्था इत्यादींना लागू करता येत नाही. तो फक्त नैसर्गिक व्यक्तींनाच लागू होऊ शकतो. कोणत्याही नागरिकांच्या खासगी आयुष्यावर अतिक्रमण करण्याचा उद्देश नाही ही खबरदारी हा अधिनियम घेतो. त्यामुळे नाव, तारखा, वय अशा खासगी आयुष्यावर अतिक्रमण ठरणार नाही अशी माहिती नाकारण्यासाठी हा अपवाद वापरता येणार नाही.

जन माहिती अनेकदा याचा चुकीचा अर्थ लावतात आणि या अपवादाचे *"परंतु, जी माहिती संसदेला किंवा राज्य राज्य विधानमंडळास देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीस देण्यासही नकार देता येणार नाही."* हे परंतुक वाचत नाहीत. जन माहिती अधिकाऱ्याने हा अपवाद लागू करून माहिती नाकारली तर ती तो संसद किंवा राज्य विधिमंडळास देखील देणार नाही अशा अर्थाचे हे परंतुक महत्वपूर्ण आहे.

सार्वजनिक असलेली बहुतेक सर्व माहिती सहसा विधिक क्षमतेत असते आणि ती स्वेच्छेने जाहीर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे, अशा परिस्थितीत अर्जदार संबंधित खात्याच्या अपीलिय प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करू शकतो. अपीलात ती माहिती पुढे संसदेशी सामायिक केली जाणार नाही अशी हमी मागू शकतो. ती देऊ न शकल्यास माहिती अर्जदाराशी सामायिक करणे भाग पडते.

ए एम कालरा विरुद्ध मानव संसाधन खाते या प्रकरणात अपीलार्थीने प्रवास भत्त्याचे खोटे दाखले इत्यादि सादर करण्यासाठी श्री आर आर सिंग यांना केलेल्या शिक्षेबाबत माहिती मागितली होती. परंतु, केंद्रीय माहिती आयोगाने ग्राह्य धरले की मागितलेली माहिती जनहित/ सार्वजनिक क्रियाकलापांशी संबंधित असल्याने तिला कलम ८(१)(ज) च अपवाद लागू करता येणार नाही.

**२. अधिनियमातील अपवाद: कलम ९**

माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ९ नुसार, *"एखादी माहिती पुरवण्याच्या विनंतीमुळे जर, राज्याव्यतिरिक्त अन्य एखाद्या व्यक्तीच्या कॉपीराईटचे उल्लंघन होत असेल तर, कलम ८ च्या तरतुदींना बाधा न येऊ देता, यथास्थिती, केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्यास, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्यास, अशी माहिती पुरवण्याची विनंती नाकारता येईल."*

याचा संदर्भ एखाद्या व्यक्तीच्या कॉपीराईटशी  निगडीत माहिती पुरवता येणार नाही या अपवादाशी आहे.

उदाहरण:- एखाद्या अर्जदाराने एखाद्या सिनेमाची सेन्सॉर कॉपी मागितली तर ती कलम ९ खाली येत असल्याने सामायिक करता येणार नाही. परंतु कॉपीराईटच्या दाव्याचा हा अपवाद केवळ खासगी व्यक्ति किंवा संस्थांना लागू करता येईल आणि राज्याच्या कॉपीराईटच्या दाव्यांना करता येणार नाही. राज्याकडे कॉपीराईट निहित आहेत या आधारे कोणतीही माहिती नाकारता येणार नाही. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन विरुद्ध सुधीर व्होरा या प्रकरणात न्यायालयाने ग्राह्य धरले की माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ९ मधील “राज्याव्यक्तिरिक्त” या शब्दातून हा अपवाद केवळ जेथे असे प्रकटीकरण राज्याखेरीजकरून अन्य व्यक्तीच्या कॉपीराईटचा संबंध आहे तेथेच लागू करण्याचा विधिमंडळाचा हेतु दर्शवतो. **राज्याकडे कॉपीराईट असलेल्या माहितीचे प्रकटीकरण नाकारण्याचे स्वातंत्र्य त्यात नाही.** त्यामुळे दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन मागितलेली माहिती सामायिक करणे मेट्रोच्या स्तंभाच्या स्थूणायुक्त तलाधाराशी संबंधित मानचित्राच्या कॉपीराईटचा संबंध असला तरी नाकारू शकत नाही.

**३. अपवाद कसे टाळावेत?**

माहितीचा अधिकार अधिनियम नागरिकांना सार्वजनिक प्राधिकरणांकडून माहिती मिळवण्याचा अधिकार प्रदान करतो. परंतु वर नमूद केल्याप्रमाणे अनेकदा जन माहिती अधिकाऱ्यांचा कल या अपवादांना लागू करून माहिती नाकारण्याकडे असतो. तुमचा अर्ज फेटाळला जाणे टाळण्यासाठी पुढील बाबी सतत ध्यानात ठेवणे आवश्यक आहे:-

**अ.** तुम्ही मागवलेल्या माहितीस माहितीच्या अधिकारातील अपवाद लागू होते असा जन माहिती अधिकाऱ्याला विश्वास वाटत असल्यास त्याने किंवा तिने त्यांना असे का वाटते याचा कारणमीमांसेसह उत्तर देणे आवश्यक असल्याचे तुमच्या अर्जात तुम्ही नमूद करणे आवश्यक आहे.

**आ.** ज्यानुसार तुम्ही मागत असलेली माहिती माहिती अधिकाराखाली यापूर्वी पुरवलेली आहे अशा आयोगाच्या किंवा न्यायिक संस्थांच्या पूर्वीच्या आदेशांचा तुम्ही समावेश करू शकता.

**इ.** तुम्ही मागत असलेली माहिती कलम ८(२) नुसार व्यापक लोकहिताच्या संदर्भात कशी आहे हे स्पष्ट करणारा परिच्छेद देखील तुम्ही समाविष्ट करू शकता. या कलमानुसार:-
*“शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ (१९२३ चा १९) किंवा पोट कलम (१) अनुसार अनुज्ञेय असलेले कोणतेही अपवाद यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, माहिती प्रकट केल्याने साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधास होणाऱ्या हानीपेक्षा अधिक असेल तर, सार्वजनिक प्राधिकरण, ती माहिती पाहण्यास परवानगी देऊ शकेल.”*

***<u>माहिती अधिकाराखालील नमूना अर्ज</u>***

ऑक्टोबर ३१, २०२१

प्रति,

जन माहिती अधिकारी,
महानगरपालिका
नवी दिल्ली, भारत

मा. महोदय/ महोदया,

सुभाष चंद्र आगरवाल विरुद्ध लोकसभा सचिवालय आणि अन्य या प्रकरणात मा दिल्ली उच्च न्यायालयाने दिनांक ०२.०७.२०१९ रोजी असे ग्राह्य धरले आहे की महासचिवांच्या कालावधीत वाढ करण्याच्या संदर्भातील चर्चेबाबतची माहिती सार्वजनिक माहिती आहे.

या निकालाच्या परिप्रेक्षात, माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये पुढील माहिती मागवण्यात येत आहे. कृपया पुढील माहिती पुरवावी:

१. सभागृहनेते, विरोधी पक्षनेते आणि सभागृहाचे सभापती यांच्यात लोकसभेच्या महासचिवांच्या कालावधीत वाढ करण्याच्या संदर्भातील चर्चेबाबत देवाणघेवाण झालेली कागदपत्रे.
२. महासचिवांच्या कालावधीत झालेल्या वाढीचा कालखंड.
३. उपरोक्त मुदतवाढीस मान्यता देणारे महासचिवांचे पत्र.

आपला,
यक्षज्ञ

**अर्ज निकाली काढण्यापूर्वी कृपया पुढील बाबी विचारात घ्याव्यात**

१. आवश्यक असल्यास, कृपया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(३) अन्वये माहिती मिळवणेकामी 'रास्त सहकार्य करावे'.
२. माहिती अंशत किंवा पूर्णत: अन्य विशिष्ठ खात्याकडे उपलब्ध असल्यास, कलम ६(३) मध्ये केलेल्या तरतुदींनुसार अर्ज पूर्णत: किंवा अंशत: संबंधित खात्याकडे अंतरित करावा.